नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या स्थायी समितीने संमत केलेला ठराव क्र.८५ दि.१२/१०/२०१८ विखंडीत करण्यासाठी निलंबित करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग
शासन निर्णय क्रमांक : नामपा-२०१९/प्र.क्र.७९/नवि-२४,
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक:- १ एप्रिल, २०१९

संदर्भ :- आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका यांचे पत्र क्र.नावाशमनपा/साप्रवि / आस्था २/१२४५६/२०१८/दिनांक २९.११.२०१८

प्रस्तावना : -

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या सफाई आस्थापनेवर कार्यरत असलेल्या ६ पुरुष मजूर कर्मचा-यांचे पदनाम बदलून स्वच्छता निरीक्षक हे पदनाम देऊन या पदाची वेतनश्रेणी देण्यात यावी. सदरची नियुक्ती महानगरपालिकेच्या आस्थापनेवर रिक्त असलेल्या स्वच्छता निरीक्षक या पदावर देण्यात यावी किंवा आकृतीबंध मंजूरीच्या अधिन राहुन देण्यास ही महानगरपालिका स्थायी समितीची सभा सर्वानुमते मंजूर करते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो असा ठराव क्र.८५ दि.१२.१०२०१८ हा नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या स्थायी समितीने संमत केलेला आहे. सदरील ठराव हा विषय पत्रिकेवर न घेता मा. सभापती यांच्या आदेशान्वये आयत्यावेळी घेवून ठराव क्र.८५,दि.१२.१०.२०१८ रोजी संमत केलेला आहे.

२. महानगरपालिका प्रशासनाने त्याच्या संदर्भाधिन दि.२९.११.२०१८च्या पत्रात नमुद केले आहे की, सदरील उक्त कर्मचारी हे महानगरपालिका सफाई आस्थापनेवर पुरुष मजूर या पदावर कार्यरत आहेत. महानगरपालिका सफाई आस्थापनेवरील पुरुष मजूर /स्त्री मजूर ही पदे वर्ग ४ या संवर्गातील असून, सदर पदाची वेतनश्रेणी ४४४०-७४४० ग्रेड पे १३०० आहे . स्वच्छता निरीक्षक हे पद वर्ग ३ या संवर्गातील असून, स्वच्छता निरीक्षक या पदाची वेतनश्रेणी ५२००-२०२०० ग्रेड पे २४०० आहे.

महानगरपालिका आस्थापनेवर स्वच्छता निरीक्षकाची एकूण १४ पदे मंजूर आहेत. त्यापैकी सध्या १२ स्वच्छता निरीक्षक कार्यरत असून स्वच्छता निरीक्षकाची २ पदे रिक्त आहेत. तथापि, स्वच्छता निरीक्षक हे पद साखळी पदोन्नतीत येत नसल्यामुळे, तसेच संबंधित कर्मचारी वर्ग ४ पुरुष मजूर या संवर्गातील असल्याने सर्व संबंधितांचे पदनाम बदलता येणार नाही अथवा पदोन्नती देता येणार नाही. महानगरपालिकेच्या स्थायी समितीने संमत केलेला उक्त ठराव हा महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, कलम ४५१ अन्वये, विखंडित करण्याबाबतची विनंती आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका यांनी दिनांक २९.११.२०१८ च्या पत्रान्वये केलेली आहे.

३. उपरोक्त नमूद बाबीं विचारात घेऊन सदरचा ठराव क्र. ८५ दिनांक १२.१०.२०१८ निलंबित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय</u> :-

महानगरपालिकेच्या स्थायी सभेने सफाई आस्थापनेवर कार्यरत असलेल्या ६ पुरुष मजूर या कर्मचा-यांचे पदनाम बदलून ते स्वच्छता निरीक्षक असे करुन त्या पदाची वेतनश्रेणी देण्याबाबतचा ठराव क्र.८५ दि.१२.१०.२०१८ संमत केलेला आहे. पुरुष मजूर ही पदे वर्ग ४ संवर्गातील असुन स्वच्छता निरीक्षक हे पद वर्ग ३ संवर्गातील आहे. त्याचप्रमाणे दोन्ही पदांची वेतनश्रेणी ही वेगवेगळी आहे. ही सर्व वस्तुस्थिती लक्षात घेता, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या स्थायी समितीचा ठराव क्र.८५, दि.१२.१०.२०१८ हा संयुक्तिक व सनदशीर ठरत नसल्यामुळे सदर ठराव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम ४५१ (१) नुसार विखंडित करण्यासाठी प्रथमत: निलंबित करण्यात येत आहे.

सदर ठराव निलंबनाप्रकरणी संबंधितांना अभिवेदन करावयाचे असल्यास त्यांना निलंबन आदेशाच्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत शासनास अभिवेदन करणे आवश्यक आहे.

सदरचा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्रमांक २०१९०४०११४४६५०३३२५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Pradeep Patil

Digitally signed by Pradeep Patil
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Urban Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=05334a0514755cf2d85a6ca44c91e73cfa8132 3e994582a4a27e428d216ef701, cn=Pradeep Patil
Date: 2019.04.01 14:49:36 +05'30'

(प्रदिप पाटील)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधानसचिव,मंत्रालय,मुंबई-३२
२) आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड.
३) नगर सचिव तथा प्राधिकृत अधिकारी, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.
४) प्रधान सचिव, (नवि-२), नगर विकास विभाग, यांचे स्वीय सहाय्यक
५) सहसचिव, यांचे स्वीय सहाय्यक, नवि-२४,नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई (वेबसाईटवर प्रसिध्दी करिता).
६) निवड नस्ती (नवि-२४) (२ प्रती)